महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्रमांकः तंशिविकापु/विवि/Intake Approval/२०२२-२३/ ३८४१ — दिनांक : १७.०८.२०२२

**महत्वाचे परिपत्रकः** — 17 AUG 2022

प्रति,
प्राचार्य,
पोस्ट एस.एस.सी. प्रथम व थेट द्वितीय वर्ष व
पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भ : १) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/Intake Approval/२०२१-२२/३२९६ दिनांक १२.०७.२०२२.
२) या विभागीय कार्यालयाचे शुध्दीपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/Intake Approval/२०२२-२३/३४३४ दिनांक १९.०७.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ व २ मधील अनुक्रमे परिपत्रक व शुध्दीपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थांना **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ वर्षासाठी** पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी होण्याकरीता संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणेबाबत सूचित करण्यात आलेले होते.

पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका तसेच पोस्ट एच.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांना विकल्प अर्ज भरण्याच्या कालावधीपूर्वी प्रवेशाकरीता उपलब्ध संस्थानिहाय जागांचा तपशिल (**प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी दिनांक १९.०८.२०२२ व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी दिनांक २०.०८.२०२२**) संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित होणार आहे. ज्या संस्थांनी अद्यापपर्यंत आपली माहिती अद्ययावत केली नसेल अशा संस्थांनी तात्काळ अद्ययावत करुन **आजच** विभागीय कार्यालयाकडे मंजूरीस्तव पाठवावी. तसेच ज्या संस्थांची प्रवेश क्षमतेविषयी माहिती काही त्रुट्या असण्याच्या कारणास्तव पुन्हा संस्थेकडे पाठविली असेल अशा संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये त्रुटींची पूर्तता करुन **आजच** विभागीय कार्यालयाकडे मंजूरीस्तव पाठवावी.

ज्या संस्था प्रवेश क्षमतेची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणार नाहीत किंवा कागदपत्रांच्या त्रुटीं अभावी या विभागीय कार्यालयाकडून प्रवेश क्षमता मंजूर करण्यात आलेली नाही अशा संस्थांच्या नावांचा समावेश प्रवेश विकल्प अर्जांच्या यादीमध्ये होणार नाही याची नोंद सर्व संस्थाप्रमुखांनी घ्यावी. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील.

**टिप : ज्या संस्थांची प्रवेश क्षमतेविषयी माहिती या विभागीय कार्यालयाकडून मंजूर झालेली असेल, अशा संस्थांनी त्यांचे लॉगीनमध्ये प्रवेश क्षमता अचूक असल्याबाबतची खात्री करुन घ्यावी. याबाबत काही त्रुटी असल्यास या विभागीय कार्यालयाशी तात्काळ संपर्क करावा.**

(मा. रा. जाधव)
सहायक संचालक (तां),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे (या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)